# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

व्दारा, महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कार्यालय इमारत

(दुसरा व चौथा मजला) सर्व्हे नं. ८३२ ए, शिवाजीनगर पुणे ४११००४

दूरध्वनी क्र.:- 020 - 29709617, 29709396 वेबसाइड:-mscepune.in ई-मेल :-mscepune@gmail.com


जा.क्र. मरापप/भांडार/प्रपत्र छपाई/2025/3920

दि. 26/08/2025.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद

दि. 26 AUG 2025

जावक क्र. 3920

प्रति,

---------------------------

---------------------------

---------------------------

**विषय** :- विविध प्रपत्रे छपाई करुन परीक्षा परिषदेस पुरवठा करणेबाबत संस्था नियुक्ती करणेसाठी दरपत्रक मागविणेबाबत.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे ही संस्था राज्यात विविध प्रकारच्या परीक्षांचे आयोजन करते. आयोजन करण्यात येणाऱ्या विविध परीक्षांसाठी आवश्यक असलेल्या विहित केलेली प्रपत्रे, पावती पुस्तके, पुस्तिका इ. ऑफसेट छपाई करुन पुरवठा करणाऱ्या पात्र व इच्छूक संस्थांकडून एक वर्ष कालावधीसाठी खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून दोन लिफाफे (तांत्रिक आणि वित्तीय) पध्दतीने दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

**अटी व शर्ती-**

1. परिषदेने दिलेले छपाई विषयक काम हे मराठी व इंग्रजी या भाषांसाठी असेल. या भाषांच्या छपाईसाठी आवश्यक सॉफ्टवेअर, भाषा जाणणारा कर्मचारी वर्ग इ. सर्व तांत्रिक बाबी मुद्रणालयाकडे पुरेशा संख्येइतके आवश्यक राहील.
2. छपाईच्या वेळी परिषदेने निश्चित केलेल्या आकाराचा, मिलचा, ग्रॅमेजचा व सक्षम प्राधिकाऱ्याने निश्चित केलेल्या (Cobb) कागद उपलब्ध करून घेणे जबाबदारी संबंधित संस्थेची राहील. कार्यादेश दिल्यानंतर कॉबचा निकषानुसार परिषदेने निश्चित केलेल्या कागद उपलब्ध झाला नाही तर बाजारात उपलब्ध असलेला नमुना व मान्य निकषानुसार परिषदेने निश्चित केलेला कागद छपाईसाठी वापरता येईल. मात्र त्यापोटी परिषदेच्या नुकसानीची भरपाई देयकातून करून घेतली जाईल. व कागद उपलब्ध न केल्याबददल संबंधित संस्थेविरूध्द परिषदेमार्फत निश्चित केल्या जाणाऱ्या दराने दंडात्मक कारवाई केली जाईल.
3. छपाईच्या माध्यमनिहाय प्रत्येक पानाचे डी.टी.पी. काम पूर्ण करून त्याच्या प्रती परिषदेने दिलेल्या सूचनाबरहुकूम प्रुफ रीडींग करून घेण्याची जबाबदारी एजन्सीची राहील. छपाईच्या प्रुफची प्रत मान्यतेसाठी परिषदेस द्यावी लागेल. प्रुफांमधील सर्व त्रुटी दूर होईपर्यंत त्यांच्या प्रती या कार्यालयास तपासणी व दुरुस्तीसाठी द्याव्या लागतील. **प्रुफ रिडींगसाठी वेगळे आकार दिले जाणार नाहीत**. त्यामुळे आवश्यकतेनुसार छपाईच्या अनुषंगाने डी.टी.पी., प्लेट मेकिंग इ. सर्व कामे एजन्सीस पूर्ण करावी लागतील. **यासाठी वेगळे दर मान्य केले जाणार नाहीत**.
4. परिषदेंतर्गत कामासाठी निश्चित केलेल्या एजन्सीमार्फत डी.टी.पी., डाटा एन्ट्री करुन घेतल्यास परिषदेच्या दैनंदिन कामावर त्याचा विपरित परिणाम होत असल्याने एजन्सीकडे सोपविलेल्या कामाची परिषदेच्या दैनंदिन कामासाठी निश्चित केलेल्या एजन्सीमार्फत डी. टी. पी., डाटा एन्ट्री करुन घेता येणार नाही.
5. सर्व प्रकारच्या करांचा विचार करुन कागदासह विविध प्रपत्रे छपाईचे दर जीएसटी व इतर सर्व करासहित नमूद करावेत. कोणताही कर शासन सदरी जमा करण्याची जबाबदारी ही दरपत्रक मान्य झालेल्या संस्थेची राहील.
6. निविदाकारास (दरपत्रक) मान्य झालेल्या संस्थेसोबत रुपये 500/- स्टँम्प पेपरवर करारनामा करणते येईल.
7. विविध प्रपत्रे छपाई पुरवठा करणेबाबत छपाई करणाऱ्या संस्थेची सेवा समाधानकारक नसल्यास देण्यात येणारी सेवा नाकारण्यात येईल. याची संपूर्ण जबाबदारी निविदाकाराची राहील.
8. निविदाकारास देण्यात येणारे काम हे कालमर्यादित स्वरुपाचे असल्याने ते परिषदेने ठरवून दिलेल्या वेळेमध्ये पूर्ण करुन देणे एजन्सीवर बंधनकारक राहील. पुरवठा आदेश दिल्यानंतर 10 दिवसामध्ये संपुर्ण पुरवठा करणे बंधनकारक आहे. ठरवून दिलेल्या मुदतीत विविध प्रपत्रे प्रिंटींग करुन पुरवठा न केल्यास **दंडात्मक रक्कम ही पुरवठा आदेशाच्या 5 टक्के एवढा दंड आकारण्यात येईल**.
9. निविदाकारास (संस्थेकडे) सोपविलेल्या कामामध्ये काही चुका झाल्यास किंवा विहित केलेल्या अटी व शर्तीचा भंग झाल्यास महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद आकारेल त्याप्रमाणे दंडाची रक्कम आपणांस भरावी लागेल.
10. विविध छपाई करावयाच्या प्रपत्रांचे नमुने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.
11. निवडण्यात येणाऱ्या संस्था/पुरवठादार यांच्या नियुक्तीचा **कालावधी एक वर्ष** असेल. दिलेले काम यामध्ये रद्द करणे, किंवा मुदतवाढ देणे याबाबतचे सर्व अधिकार मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांना राहतील.

12. एकदा दरपत्रक स्वीकृत केल्यानंतर व त्यानंतर कार्यवाही सुरु केल्यानंतर कोणताही प्रश्न, वाद उदभवल्यास केवळ पुणे न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात दाद मागता येईल.
13. एकदा भरुन दिलेल्या दरपत्रकातील वित्तीय दराशी निगडीत कामाच्या संख्येत / प्रमाणात कोणत्याही कारणास्तव दुरुस्ती किंवा बदल करण्यास परवानगी दिली जाणार नाही. निविदाकारास दर स्विकृत केल्यानंतर दिल्या जाणाऱ्या कार्यादेशानुसार आदेशित केलेल्या कामात / साहित्य पुरवठयामध्ये विलंब केल्याचे आढळून आल्यास किंवा कार्यादेशातील साहित्याच्या तपशीलानुसार (specification) केलेल्या पुरवठयाच्या साहित्यात त्रुटी असल्याचे आढळून आल्यास तसेच केलेल्या कामाच्या / पुरविण्यात आलेल्या साहित्याच्या दर्जाबाबत तक्रार प्राप्त झाल्यास सविस्तर चौकशी करण्यात येईल. चौकशी होऊन त्यावर अंतिम निर्णय होईपर्यंत त्यासाठीची देय रक्कम अदा केली जाणार नाही किंवा त्यावरील व्याजही दिले जाणार नाही.
14. दरपत्रक प्रसिध्द केलेल्या सूचनेनुसार छपाई करावयाच्या विविध प्रपत्रेच्या (offset printing) संदर्भाने Notification No.12/2017, दिनांक 28 जून 2017 मधील Entry No. 66 अंतर्गत व वेळोवेळी सुधारणा केल्यानुसार GST मधून सुट आहे. त्यामुळे वित्तीय लखोट्यातील (लखोटा क्र.2) चे दर (GST व सर्व करासह) सादर करण्यात यावेत.
15. विविध प्रपत्रे छपाई पुरवठ्याबाबत एकच संस्था निश्चित करावयाची असल्याने दरपत्रकामध्ये ज्या निविदाकाराचे सर्वात जास्त बाबींसाठी न्यूनतम दर प्रकारनिहाय प्राप्त झाले आहेत, अशा संस्थेला इतर प्रकारांसाठी ज्या इतर संस्थेचे / संस्थांचे जे न्यूनतम दर प्राप्त झाले आहेत ते मान्य करावे लागतील, व त्या दराने परिषदेस विविध प्रपत्रे छपाई पुरवठ्याचे काम करावे लागेल. निश्चित करण्यात आलेल्या निविदाकार संस्थेने मान्य दराने परिषदेच्या मागणीनुसार छपाई करावयाच्या प्रपत्रांचा पुरवठा केला नाही असे परिषदेच्या लक्षात आले तर अशावेळी याच मान्य दराने इतर संस्थांकडून छपाई करावयाच्या प्रपत्रांचा पुरवठा करुन घेतला जाईल, व त्यासाठी येणारा सर्व खर्च मान्य निविदाकार संस्थेच्या आगामी कोणत्याही देयकातून वजाती करुन घेतला जाईल.
16. निविदाकाराने संस्थेच्या वतीने बैठकीस उपस्थित राहणे, कागदपत्रावर स्वाक्षरी करणे आणि इतर अनुषंगिक कामकाजासाठी प्राधिकृत म्हणून नियुक्त केल्यास लखोटा क्र.1 तांत्रिक कागदपत्रे सोबत (सदर व्यक्तीचे प्राधिकारपत्र जोडणे आवश्यक आहे.
17. कोणतीही निविदा कोणतेही कारण न देता अंशत: अथवा पूर्णत: स्विकारणे अथवा नाकारणे याबाबतचा पूर्ण अधिकार महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचा राहील.
18. दरपत्रक बंद पाकिटात **लखोटा क्र.1 तांत्रिक कागदपत्रे व लखोटा क्र.2 वित्तीय दर** स्वतंत्र सादर करण्यात यावे.
19. दरपत्रक दि. 04 / 09 /2025 रोजी उघडण्यात येईल. त्यावेळेस आपण अथवा आपला प्रतिनिधी योग्य त्या ओळखपत्रासह हजर राहू शकतो. काही प्रशासकीय वा कार्यालयीन अडचणीमुळे दरपत्रक उघडणे शक्य नाही तर लगतच्या नंतरच्या दिनांकास वा परिषदेच्या सोयीनुसार ठरवून दिलेल्या दिवशी उघडण्यात येतील.
20. दरपत्रक स्विकृत दि.03 / 09 /2025 रोजी सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, व्दारा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, (राज्यमंडळ) भांबुर्डा, शिवाजीनगर, आघारकर इन्स्टिटयुट मागे, आगरकर रोड, पुणे - 04 येथे **(दुसरा मजला, आवक-जावक शाखेत)** कार्यालयात हस्तपोच / सादर करण्यात यावी / देण्यात यावी.
21. टपालाव्दारे/मेलव्दारे/कुरीअर व्दारे प्राप्त दरपत्रके स्विकारली जाणार नाहीत.
22. **लखोटा क्र.1** मध्ये सर्व तांत्रिक कागदपत्रे जोडून **(लखोटा क्र.1 तांत्रिक कागदपत्रे)** सिलबंद करण्यात यावा व त्यावर तांत्रिक कागदपत्रे बाबतचा लखोटा असा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.
23. **लखोटा क्र.2** मध्ये कामाचा तपशिल तक्ता **(लखोटा क्र.2 वित्तीय दर)** संस्थेनी संस्थेच्या लेटरहेडवर वित्तीय दर सर्व करासहित नमूद करुन लखोटा सिलबंद करण्यात यावा व त्यावर दराचा लखोटा असे स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.
24. **लखोटा क्र.1** मधील दर्शविलेली प्रमाणपत्रे अपूर्ण असल्यास **लखोटा क्र.2** वित्तीय उघडण्यात येणार नाहीत. अथवा याबाबतचा अंतिम निर्णय दरपत्रक समितीचा राहील.
25. संस्थेकडून अटी नमूद करण्यात आलेल्या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही. परिषदेकडून याबाबत सबबी ऐकून घेतल्या जाणार नाहीत वा त्याकडून पत्रव्यवहार करण्यास महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद बांधील राहणार नाही.
26. सदर दरपत्रक परिषदेच्या संकेतस्थळांवर www.mscepune.in उपलब्ध आहे.
27. दरपत्रकामध्ये भरण्यात येणारे दर अंकात अथवा टंकलिखित स्वरुपात (योग्य त्या सॉफ्टवेअर नुसार) नमूद करावे. त्यामध्ये खाडाखोड करु नये. अपवादात्मक खाडाखोड असलेले दरपत्रक ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.
28. संस्था शासनाच्या काळ्या यादीमध्ये नाव असल्यास सदर संस्था अपात्र ठरविली जाईल.
29. निविदाकाराने दरपत्रकांवर निविदाकाराची स्वाक्षरी नाव व शिक्का असणे आवश्यक राहील. निविदाकाराची स्वाक्षरी नाव व शिक्का नसलेली निविदा दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.
30. कोणतेही कारण न दर्शविता दरपत्रक रद्द करण्याचा किंवा न स्विकारण्याचा अधिकार मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांनी राखून ठेवलेला आहे.

Digitally signed by
Anurradha Avinash Oak
Date: 19-08-2025
23:41:45

(अनुराधा ओक)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे.

**लखोटा क्र.1 तांत्रिक कागदपत्रे -**

1. सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला वैध ऑफसेट छपाई परवाना.
2. ITR Assessment Year सन 2023-24, 2024-25.
3. GSTR-3B भरल्याचे जानेवारी, फेब्रुवारी, मे 2025 या तीन महिन्याचे प्रमाणपत्र.
4. प्रोप्रायटर यांचे आधार कार्ड प्रत.
5. संस्थेचे/प्रोप्रायटर यांचे पॅन कार्ड.
6. जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र.
7. सनदी लेखापाल यांच्या स्वाक्षरीने मागील, सन 2022-2023 व सन 2023-2024 सन 2024-2025 या तीन वर्षापैकी किमान एक वर्षाचे वार्षिक उलाढाल **रु.10 लाख** उलाढाल असल्याचे प्रमाणपत्र.
8. निविदा भरणाऱ्या संस्थेने (शासकीय / निमशासकीय / खाजगी संस्था) या कार्यालयामधील विविध प्रपत्रे छपाई केल्याचे मागील (सन 2019-20, 2020-21, 2021-22, 2022-23, 2023-24) **या पाच वर्षापैकी किमान एक** वर्षांचे अनुभव प्रमाणपत्र. (कार्यादेश विचारात घेतले जाणार नाही.)
9. निविदाकार यांनी आपली संस्था राज्य / केंद्र / मा. न्यायालय तथा अन्य संस्थांनी काळया यादीत समाविष्ट नसल्याचे संस्थेच्या स्वत: च्या लेटरहेडवर स्वंयघोषणा पत्र.
10. निविदाकाराने दरपत्रक सादर करतांना द्यावयाचे प्रमाणपत्र स्वाक्षरीसह जोडण्यात यावे.

**निविदाकाराने दरपत्रक सादर करतांना द्यावयाचे प्रमाणपत्र (अट क्रमांक 10 नुसार)**

मी, निविदाकार मालक / प्राधिकृत अधिकारी असे प्रमाणित करतो की, दरपत्रकातील अटी व शर्तीचे काळजीपुर्वक वाचन केले असून, त्या सर्व समजून घेतल्या आहेत. या सर्व अटी व शर्ती मान्य आहेत. त्यानुसार दरपत्रकासोबत लखोटा क्रमांक 1 व 2 सोबत परिपुर्ण भरून दिलेले आहेत. परिषदेतील विविध प्रपत्रे छपाई पुरवठ्याचे काम योग्यरित्या पुरवठा करण्यास बांधील राहु. सदर सेवा पुरवठा करण्यामध्ये कोणत्याही प्रकारची हयगय व विलंब होणार नाही याची दक्षता घेवू. सदर सेवा योग्यरित्या कार्यरत ठेवण्याची संपुर्ण जबाबदारी आमची राहील.

दिनांक :-

निविदाकाराचे नाव, स्वाक्षरी व शिक्का

निविदाकाराचे नांव -

स्वाक्षरी -

शिक्का -

## लखोटा क्र.2 वित्तीय दर - विविध प्रपत्रे ऑफसेट छपाई दरपत्रक -

| अ.क्र. | कामाचा प्रकार | छपाई संख्या | (GST व सर्व करासह) | |
|---|---|---|---|---|
| | | | एका बाजूस | पाठपोट |
| 1 | A-4 साईज B/W 70 GSM | प्रति 500 | | |
| | | प्रति 1000 | | |
| 2 | A-4 साईजच्या निम्मे B/W 70 GSM | प्रति 500 | | |
| | | प्रति 1000 | | |
| 3 | A-4 साईज कलर हेडींग किंवा कोणत्याही रंगीत शाईत 70 G.S.M. | प्रति 500 | | |
| | | प्रति 1000 | | |
| 4 | A - 4 साईज कलर हेडींग किंवा कोणत्याही रंगीत शाईत (लेटर हेड) 90 GSM | प्रति 100 | | |
| | | प्रति 200 | | |
| 5 | A-3 साईज कलर हेडींग किंवा रंगीत शाईत 70 G.S.M. | प्रति 500 | | |
| | | प्रति 1000 | | |
| 6 | फुलस्केप साईज लेजर पेपर 70 GSM | प्रति 500 | | |
| | | प्रति 1000 | | |
| 7 | फुलस्केप विविध रंगात 70 GSM | प्रति 500 | | |
| | | प्रति 1000 | | |
| 8 | A-3 साईज (B/W) 70 GSM | प्रति 500 | | |
| | | प्रति 1000 | | |
| 9 | A-3 साईज रंगीत पेपर 70 G.S.M. कागदावर छपाई | प्रति 500 | | |
| | | प्रति 1000 | | |
| 10 | A-4 साईज रंगीत पेपर 70 G.S.M. कागदावर छपाई | प्रति 500 | | |
| | | प्रति 1000 | | |
| 11 | A-3 साईज रंगीत पेपर 70 G.S.M. मॅपलिथो कागदावर छपाई | प्रति 500 | | |
| | | प्रति 1000 | | |
| 12 | A-4 साईज रंगीत पेपर 70 G.S.M. मॅपलिथो कागदावर छपाई | प्रति 500 | | |
| | | प्रति 1000 | | |
| 13 | A-3 लेजर पेपर / रंगीत पेपर / पांढरा घोटीव (परफोरेटिंग व नंबरींगसह छपाई इ. ) | प्रति 500 | | |
| | | प्रति 1000 | | |
| 14 | फुलस्केप (B/W) 100 पेपरचे पॅड पुठ्ठा नंबरिंगसह (70 G.S.M.) | प्रति पॅड (500) | | |
| | | प्रति पॅड (1000) | | |
| 15 | पावती पुस्तके 6 इंच X 8.5 इंच A-8 साईज 10 पानी खालीवर ब्राऊन पेपर पिनींगसह (B/W) | प्रति 1000 | | |
| 16 | A-4 साईजच्या निम्मे 8 पानी (B/W 70 GSM) छपाई, पिनींगसह | प्रति 500 | ----------- | |
| | | प्रति 1000 | ----------- | |
| 17 | A-4/8 पानी (B/W) छपाई, पिनींगसह | प्रति 100 | ----------- | |
| | | प्रति 500 | ----------- | |
| | | प्रति 1000 | ----------- | |
| 18 | A-4/16 पानी (B/W) छपाई, पिनींगसह, खालीवर जाडकव्हर सिट (रंगीत / घोटीव पांढरा कागद कव्हरसह) | प्रति 100 | ----------- | |
| | | प्रति 500 | ----------- | |
| | | प्रति 1000 | ----------- | |
| 19 | A-4/20 पानी (B/W) छपाई, पिनींगसह, खालीवर जाडकव्हर सिट (रंगीत / घोटीव पांढरा कागद कव्हरसह | प्रति 100 | ----------- | |
| | | प्रति 500 | ----------- | |
| | | प्रति 1000 | ----------- | |
| 20 | A-4/24 पानी (B/W) छपाई, पिनींगसह, खालीवर जाडकव्हर सिट (रंगीत / घोटीव पांढरा कागद कव्हरसह) | प्रति 100 | ----------- | |
| | | प्रति 500 | ----------- | |
| | | प्रति 1000 | ----------- | |

| अ.क्र. | कामाचा प्रकार | छपाई संख्या | (GST व सर्व करासह) | |
|---|---|---|---|---|
| | | | एका बाजूस | पाठपोट |
| | A-4/32 पानी (B/W) छपाई, पिनींगसह, खालीवर जाडकव्हर सिट (रंगीत / घोटीव पांढरा कागद कव्हरसह) | प्रति 100 | ----------- | |
| | | प्रति 500 | ----------- | |
| | | प्रति 1000 | ----------- | |
| 21 | A-4/40 पानी (B/W) छपाई, पिनींगसह, खालीवर जाडकव्हर सिट (रंगीत / घोटीव पांढरा कागद कव्हरसह) | प्रति 100 | ----------- | |
| | | प्रति 500 | ----------- | |
| | | प्रति 1000 | ----------- | |
| | A-4/48 पानी (B/W) छपाई, पिनींगसह, खालीवर जाडकव्हर सिट (रंगीत / घोटीव पांढरा कागद कव्हरसह) | प्रति 100 | ----------- | |
| | | प्रति 500 | ----------- | |
| | | प्रति 1000 | ----------- | |
| 22 | A-4/56 पानी (B/W) छपाई, पिनींगसह, खालीवर जाडकव्हर सिट (रंगीत / घोटीव पांढरा कागद कव्हरसह) | प्रति 100 | ----------- | |
| | | प्रति 500 | ----------- | |
| | | प्रति 1000 | ----------- | |
| 23 | A-4/64 पानी (B/W) छपाई, पिनींगसह, खाालीवर जाडकव्हर सिट (रंगीत / घोटीव पांढरा कागद कव्हरसह) | प्रति 100 | ----------- | |
| | | प्रति 500 | ----------- | |
| | | प्रति 1000 | ----------- | |
| 24 | A-4/72 पानी (B/W) छपाई, पिनींगसह, खालीवर जाडकव्हर सिट (रंगीत / घोटीव पांढरा कागद कव्हरसह) | प्रति 100 | ----------- | |
| | | प्रति 500 | ----------- | |
| | | प्रति 1000 | ----------- | |
| 25 | A-4/80 पानी (B/W) छपाई, पिनींगसह, खालीवर जाडकव्हर सिट (रंगीत / घोटीव पांढरा कागद कव्हरसह) | प्रति 100 | ----------- | |
| | | प्रति 500 | ----------- | |
| 26 | A-4/88 पानी (B/W) छपाई, पिनींगसह, खालीवर जाडकव्हर सिट (रंगीत / घोटीव पांढरा कागद कव्हरसह) | प्रति 100 | ----------- | |
| | | प्रति 500 | ----------- | |
| | | प्रति 1000 | ----------- | |
| 27 | A-4/96 पानी (B/W) छपाई, पिनींगसह, खालीवर जाडकव्हर सिट (रंगीत / घोटीव पांढरा कागद कव्हरसह) | प्रति 100 | ----------- | |
| | | प्रति 500 | ----------- | |
| | | प्रति 1000 | ----------- | |
| 28 | A-4/104 पानी (B/W) छपाई, पिनींगसह, खालीवर जाडकव्हर सिट (रंगीत / घोटीव पांढरा कागद कव्हरसह) | प्रति 100 | ----------- | |
| | | प्रति 500 | ----------- | |
| | | प्रति 1000 | ----------- | |
| 29 | A-4/112 पानी (B/W) छपाई, पिनींगसह, खालीवर जाडकव्हर सिट (रंगीत / घोटीव पांढरा कागद कव्हरसह) | प्रति 100 | ----------- | |
| | | प्रति 500 | ----------- | |
| | | प्रति 1000 | ----------- | |
| 30 | A-4/120 पानी (B/W) छपाई, पिनींगसह, खालीवर जाडकव्हर सिट (रंगीत / घोटीव पांढरा कागद कव्हरसह) | प्रति 100 | ----------- | |
| | | प्रति 500 | ----------- | |
| | | प्रति 1000 | ----------- | |
| 31 | कार्डशीटसह A-4 साईज छपाई जाड GSM | प्रति 100 | | |
| | | प्रति 500 | | |
| | | प्रति 1000 | | |
| 32 | कार्डशीटसह A-3 साईज छपाई जाड GSM | प्रति 100 | | |
| | | प्रति 500 | | |
| | | प्रति 1000 | | |
| 33 | कोणत्याही प्रकारच्या आवेदनपत्रांची / इतर कागदपत्रांची छपाई दोन रंगात पाठपोट 110 G.S.M. | प्रति 100 | | |
| | | प्रति 500 | | |

| अ.क्र. | कामाचा प्रकार | छपाई संख्या | (GST व सर्व करासह) | |
|---|---|---|---|---|
| | | | एका बाजूस | पाठपोट |
| | कागद लीगल साईज / फुलस्केप | प्रति 1000 | | |
| 34 | कोणत्याही प्रकारच्या आवेदनपत्रांची / इतर कागदपत्रांची छपाई - दोन रंगात पाठपोट 110 G.S.M. कागद A - 4 साईज | प्रति 100 | | |
| | | प्रति 500 | | |
| | | प्रति 1000 | | |
| 35 | कोणत्याही प्रकारच्या आवेदनपत्रांची / इतर कागदपत्रांची छपाई - दोन रंगात पाठपोट 110 G.S.M. कागद A-3 साईज | प्रति 100 | | |
| | | प्रति 500 | | |
| | | प्रति 1000 | | |
| 36 | कोणत्याही प्रकारच्या आवेदनपत्रांची / इतर कागदपत्रांची छपाई दोन रंगात पाठपोट 110 G.S.M. कागद A-3 साईज | प्रति 1000 | | |
| 37 | वाणिज्य प्रमाणपत्र टंकलेखन उत्तरपत्रिका 70 G.S.M. कागद 22"x 35"आकारात छपाई | प्रति पॅड (100 नग) | | |
| 38 | नंबरीग | प्रति 1000 | | |
| 39 | परफोरेटिंग | प्रति 1000 | | |
| 40 | प्रमाणपत्र (चार कलरमध्ये) GSM 110 | प्रति 1 नग | | |
| 41 | इंम्पीरिअल साईज / 70 GSM कागद कलर प्रिंटिंग | प्रती 500 | | |
| 42 | इंम्पीरिअल साईज / 70 GSM कागद कलर प्रिंटिंग | प्रति 1000 | | |
| 43 | A-4 पानाचे डिटीपी करणे | प्रति नग | | |
| 44 | डी.टी.एड. परीक्षा वेळापत्रक 80 GSM कागद कलर प्रिंटिंग साईज 16 इंच X 21 इंच | प्रति 100 | | |
| 45 | सुचना फलक, 80 GSM कागद कलर प्रिंटिंग साईज 16 इंच X 21 इंच | प्रति 100 | | |
| 46 | 5 इंच X 4 इंच रोख जमा पावती पुस्तक 50 पेजेसची एक बुक (तीन प्रतीत कलरसह) 70 GSM | एक बुक (50 X 3 = 150) | | |

दरपत्रकातील सर्व अटी व शर्ती मी वाचल्या आहेत आणि त्या माझ्यावर बंधनकारक आहेत. त्यानुसार मी उपरोक्त प्रमाणे दर नमुद केलेले आहेत.

दिनांक

निविदाकाराचे नाव, स्वाक्षरी व शिक्का

निविदाकाराचे नांव-

स्वाक्षरी -